N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0336 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 04/08/2026 02:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 03/08/2026

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 03/08/2026

**Time From (वेळेपासून):** 20:41 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 04/08/2026 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 04/08/2026 02:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** धुळे शहरातील ,पश्चिम देवुपर पोलीस, स्टेशनचे आवारात,सार्व जागी धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यशवंत विश्वनाथ बोरसे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक,विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक,विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | साईनाथ भानुदास तळेकर | | | 1. 01,शिवप्रताप कलनी,तुळशीराम नगर, देवपुर,धुळे ,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अविनाश अरविंद सादरे | | | 1. एसआरपीएफ,कलनी, नकाणे रोड,धुळे नेम पश्चिम देवपुर पाोस्टे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारली व हस्तगत केलेली रक्कम 40,000/रु. तडजोडीअंती | 40,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)** **(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any** **(इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 39 वर्षे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.03.08.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार रोहित गुणवंत पाटील व त्यांचे सासरे राजेंद्र बाजीराव पाटील यांनी धुळे ला.प्र.वि. कार्यालयात समक्ष हजर राहिले. तेव्हा तक्रारदार रोहित गुणवंत पाटील यांनी त्यांचेकडे पश्चिम देवपुर पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक साईनाथ तळेकर हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडुन श्री. लखन प्रमोद थोरात, शिपाई व श्री. रविंद्र निंबा नंदन, भुकरमापक यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. प्रविण पाटील यांची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार रोहित गुणवंत पाटील व त्यांचे सासरे यांची त्यांना ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव रोहित गुणवंत पाटील, वय 35 वर्षे, खाजगी नोकरी, रा. ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, चहार्डी, ता. चोपडा, जि. जळगांव असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगुन त्यांची लेखी तक्रार त्यांच्या हस्ताक्षरात लिहुन दिली ती पुढील प्रमाणे ''माझे सासरे राजेंद्र बाजीराव पाटील यांचे नांवे मौजे वलवाडी, ता. जि. धुळे गट नं. 25/5 पैकी प्लॉट नं. 38 मध्ये घर आहे. श्री दिनेश गंगाराम पाटील व श्रीमती हर्षदा दिनेश पाटील यांनी सदर घराचे कागदपत्रांचा गैरवापर करुन सन 2015 मध्ये मॅग्मा फिनकॉर्प ऍ◌ण्ड हाऊसिंग फायनान्स यांचेकडुन परस्पर 36,10,000/- रुपयांचे गृहकर्ज (इक्वीटेबल मॉरगेज करुन) घेवुन माझे सासरे राजेंद्र बाजीराव पाटील यांची फसवणुक केली म्हणुन त्यांचेविरुध्द माझे सासरे यांनी पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज केला होता. सदर अर्जाची दखल न घेतल्याने माझया सासऱ्यांनी धुळे न्यायालयात फौजदारी किरकोळ अर्ज क्र.425/2026 अन्वये दाखल केल्याने न्यायालयाने पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन यांना लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सदर अर्जाची चौकशी पोलीस उप निरीक्षक साईनाथ तळेकर यांचेकडे देण्यात आली आहे.

त्यानंतर पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी दि.25.07.2026 रोजी माझया सासऱ्यांना फोन करुन पोलीस स्टेशनला बोलविले होते. त्याप्रमाणे मी व माझे सासरे पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन येथे जावुन पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी माझयाशी व माझया सासऱ्यांशी न्यायालयात अहवाल पाठविणेबाबत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी मला बाजुला बोलावुन ''तुमच्या सासऱ्यांच्या बाजुने आरोपींवर गुन्हा दाखल करणेबाबत सकारात्मक अहवाल कोर्टात पाठवतो, त्याकरीता तुम्हाला 50,000/- रुपये मला द्यावे लागतील'' असे सांगितले आहे. त्यानंतर मी व माझे सासरे पुणे येथे निघुन गेल्याने आम्ही पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची भेट घेतली नाही.

मला पोलीस उप निरीक्षक तळेकर यांना त्यांच्या मागणी प्रमाणे 50,000/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते न्यायालयात अहवाल पाठविण्यास विलंब करतील. माझा त्यांचे सोबत कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.



Scanned with OKEN Scanner

मी व माझे सासरे आज दि.03.08.2026 रोजी पोलीस उप निरीक्षक तळेकर यांना भेटण्यास पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन येथे जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामाफत कायदेशीर कारवाई करावी ही विंनती आहे'' बाबत लेखी तक्रार दिली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी पोलीस उप निरीक्षक साईनाथ तळेकर यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन येथे पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची भेट घेण्यासाठीं तक्रारदार यांच्या कारने तक्रारदार, त्यांचे सासरे व पंच नं. 01 थोरात यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच थोरात असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 थोरात, तक्रारदार यांनी सांगितलेली हकिगत व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण एेकुन पोलीस उप निरीक्षक साईनाथ तळेकर व पो.कॉ. अरविंद सादरे यांनी तक्रारदार व त्यांचे सासरे यांचेशी त्यांचे कामाबाबत चर्चा करुन पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी तक्रारदार व त्यांचे सासरे यांच्याकडे तुम्हाला जे सांगितले ते पो.कॉ. अविनाश सादरे यांचेकडे देवुन टाका असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी तेवढेच द्यावे लागतील का? अशी विचारणा केली. तेव्हा पो.कॉ. सादरे यांनी तेवढेच द्यावे लागतील अशी हकिगत सांगितली. त्यानंतर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण एेकुन तक्रारदार, त्यांचे सासरे व पोलीस उप निरीक्षक तळेकर तसेच पो. कॉ. सादरे यांचेत त्यांच्या कामाबाबत चर्चा होवुन पोलीस उप निरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. परंतु त्यांच्या संभाषणात लाचेच्या रकमेचा स्पष्ट उल्लेख होत नसल्याची आमची खात्री झाली.
त्यादरम्यान तक्रारदार हे ला.प्र.वि. कार्यालयाच्या बाहेर आवारात त्यांच्या कारजवळ गेल्यावर त्यांना पोलीस उप निरीक्षक तळेकर यांचा फोन येवुन त्यांनी कोठे आहेत? बाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी ते काठीयावाड हॉटेल येथे असल्याचे सांगितल्यावर पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी ते तक्रारदार यांना तेथे भेटण्यास येत असल्याचे तक्रारदार यांनी आम्हास सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन तक्रारदार, त्यांचे सासरे व पंच नं. 01 थोरात यांना धुळे येथील हॉटेल काठीयावाड येथे पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची भेट घेण्यासाठीं तक्रारदार यांच्या कारने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने ते ला.प्र.वि. कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 थोरात यांना हकिगत विचारली असता त्यांनी तक्रारदार, त्यांचे सासरे व पंच नं. 01 थोरात तक्रारदार यांच्या कारने ला.प्र.वि. कार्यालयातुन रवाना होवुन काठीयावाड हॉटेल येथे पोहोचले. तेव्हा पोलीस उपनिरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे हे त्यांच्या खाजगी कारने हॉटेलजवळ आले. तेव्हा त्यांच्या कारमधुन पो.कॉ. सादरे उतरुन तक्रारदार यांच्या कारजवळ येवुन ''गाडीत साहेब बसलेले आहेत. साहेबांशी बोलुन घ्या'' असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार व त्यांचे सासरे हे त्यांच्या कारमधुन उतरुन पोलीस उप निरीक्षक तळेकर यांना भेटण्यास त्यांच्या कारकडे निघत असतांना त्यांच्या मागे पंच थोरात देखील निघाले. तेव्हा पो.कॉ. सादरे यांनी त्यांना तुम्ही इथेच थांबा असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व तक्रारदार यांचे सासरे यांना पोलीस उप निरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे यांनी त्यांच्या कारमध्ये बसवुन तेथुन निघुन गेले. काही वेळाने ते कारने पुन्हा सदर ठिकाणी येवुन तक्रारदार व त्यांचे सासरे यांना कारमधुन उतरवुन तेथुन निघुन गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी पंच नं. 01 थोरात यांचेप्रमाणेच हकिगत सांगुन पोलीस उप निरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे यांनी तक्रारदार व त्यांच्या सासऱ्यांना काठीयावाड हॉटेल येथुन त्यांच्या खाजगी कारमध्ये बसवुन काही अंतरावर जावुन थांबले. तेथे त्यांच्यात कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी तक्रारदार व त्यांच्या सासऱ्यांना उद्देशुन तुमचे काय म्हणणे आहे सांगा? अशी विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांच्या सासऱ्यांनी 50,000/- रुपये जास्त होतात, त्यात कमी करा असे सांगितले. तेव्हा पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी किती कती कराल अशी त्यांना विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांनी 40,000/- रुपयात काम करुन द्या असे सांंगितले. तेव्हा पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी पैसे लगेच द्या असे सांगितले. तेव्हा त्यांनी अजुन घरी पण गेलो नाही, येथे जेवायला आलो. येथुन घरी जावुन येतो. असे सांगितले. तेव्हा पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी त्यांना संध्याकाळी 6/7 वाजता भेटण्यास या असे सांगितले.
तक्रारदार व पंच थोरात यांनी सांगितलेल्या हकिगतीवरुन तसेच डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण एेकुन पोलीस उप निरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे यांनी तक्रारदार यांच्याकडुन तडजोडीअंती 40,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याची आमची व पंचांची खात्री झाली.
त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 80 नोटा, असे 40,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत

सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार, तक्रारदार यांचे सासरे व पंच नं. 01 थोरात अशांना तक्रारदार यांच्या कारने पोलीस उप निरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 रविंद्र नंदन, पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे, पोहेकॉ. संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. रामदास बारेला, पोकॉ. प्रविण पाटील असे खाजगी कारने रवाना होवुन पश्चिम देवपुर पोलीस स्टेशनचे परिसरात आजुबाजुस सापळा लावला.
त्यानंतर तक्रारदार व त्यांचे सासरे यांना पोलीस उपनिरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे हे त्यांच्या कारमध्ये बसवुन बाहेर घेवुन जात असल्याचे पंच नं. 01 थोरात यांनी आम्हास इशाऱ्याने सांगितले. तेव्हा आम्ही, पंच नं. 02 व पोकॉ. मकरंद पाटील असे त्यांच्या कारच्या पाठोपाठ रवाना झालो. पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची कार धुळे शहर पोलीस स्टेशनच्या आवारात गेली. तेव्हा आम्ही पोलीस स्टेशनच्या आवाराबाहेर कार थांबवुन त्यांचेवर लक्ष ठेवुन होतो. बऱ्याच वेळाने पोलीस उप निरीक्षक तळेकर, पोकॉ. सादरे, तक्रारदार व त्यांचे सासरे असे कार मध्ये बसुन धुळे शहर पोलीस स्टेशन मधुन बाहेर रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ आम्ही देखील आमच्या खाजगी कारने रवाना झालो. पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची कार पुन्हा पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन येथे आले. तेव्हा ते सर्व जण कार मधुन उतरले. तेव्हा पंच नं. 01 थोरात हे त्यांच्या कारजवळ गेले. तेव्हा काही वेळात तक्रारदार यांनी त्यांना ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. तेव्हा आम्ही पंच थोरात यांना विचारणा करता त्यांनी ते, तक्रारदार व तक्रारदार यांचे सासरे असे तक्रारदार यांच्या कारने ला.प्र.वि. कार्यालयातुन रवाना झाले व पश्चिम देवपुर पोलीस स्टेशन येथे येवुन पोलीस उप निरीक्षक तळेकर यांची त्यांच्या कक्षात भेट घेतली. तेव्हा पो.कॉ. सादरे देखील कक्षात हजर होते. तेव्हा त्यांच्यात कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा त्यांनी पंच थोरात यांना तेथेच थांबण्यास सांगुन पोलीस उप निरीक्षक तळेकर व पो.कॉ. सादरे हे तक्रारदार व त्यांचे सासरे यांना त्यांच्या खाजगी कारमध्ये बसवुन बाहेर घेवुन गेले. त्यानंतर बऱ्याच वेळाने ते पोलीस स्टेशनच्या आवारात परत आले. तेव्हा पंच थोरात त्यांच्या कारजवळ गेले. तेव्हा ते सर्वजण कारमधुन खाली उतरले, तेव्हा पोलीस उप निरीक्षक तळेकर यांनी तक्रारदार यांना पो.कॉ. सादरे यांच्याकडे पैसे देण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या डाव्या हाताने पॅन्टच्या डाव्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन पो.कॉ. सादरे यांच्या समोर धरली असता त्यांनी त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवुन घेतल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी पंच नं. 01 थोरात यांचेप्रमाणेच हकिगत सांगितली. तेव्हा आमचे सुचनेवरुन पंच नं. 02 रविंद्र नंदन यांनी पो.कॉ. सादरे यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन ताब्यात घेतली. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोकॉ/मकरंद पाटील यांनी पो.कॉ. सादरे यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तसेच पोलीस उप निरीक्षक तळेकर यांना पो.कॉ. रामदास बारेला यांनी ताब्यात घेतले.
त्यानंतर सदर झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा ला.प्र.वि, धुळे कार्यालयात येवुन करण्यात आला आहे.

अशा प्रकारे साईनाथ भानुदास तळेकर, पोलीस उप निरीक्षक व पोलीस शिपाई अविनाश अरविंद सादरे दोन्ही नेमणुक पश्चिम देवपुर पो.स्टे यांनी तक्रारदार रोहित गुणवंत पाटील यांच्याकडे त्यांच्या सासऱ्यांच्या बाजुने आरोपींवर गुन्हा दाखल करणेबाबत सकारात्मक अहवाल कोर्टात पाठविण्यासाठी तडजोडीअंती 40,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन सापळा कारवाई दरम्यान पोलीस शिपाई अविनाश सादरे यांनी दि.03.08.2026 रोजी 20:41 वाजता पश्चिम देवपुर पोलीस स्टेशनचे आवारात तक्रारदार यांच्याकडुन 40,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन दोन्ही लोकसेवक यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
hemantkumar sahebrao bhamare (I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** hemantkumar sahet
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with OKEN Scanner